## MAHARASHTRA ACT No. III OF 1980

## THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS (TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS DUE TO ELECTIONS TO LOK SABHA) ACT, 1980

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ९ फेब्रुवारी १९८० रोजी मिळाली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

**एस. ए. धोत्रे,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग

## MAHARASHTRA ACT No. III OF 1980

## AN ACT TO PROVIDE FOR TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS TO VILLAGE PANCHAYATS DUE TO ENSUING ELECTIONS TO LOK SABHA

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक १२ फेब्रुवारी १९८० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिध्द केलेला.]

### सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

### आगामी लोकसभा निवडणुकांमुळे ग्रामपंचायतींच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.

१९५० चा ४३. **ज्याअर्थी,** लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० याच्या तरतुदी अन्वये तयार करण्यात आलेली आणि राज्य शासनास, एखाद्या प्रभागात किंवा गावात समाविष्ट असलेल्या विधानसभा मतदार संघाच्या भागासाठी, विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे त्या बाबतीत अधिसूचित करता येईल अशा तारखेस, अंमलात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी ही, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १२ अन्वये अशा प्रभागासाठीची किंवा गावासाठीची मतदार यादी आहे;

१९५९ चा मुंबई ३. **आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी ही, १ जानेवारी १९७७ या तारखेस अनुलक्षून तयार करण्यात आली होती;

**आणि ज्याअर्थी,** २२ ऑगस्ट १९७९ रोजी राष्ट्रपतींनी लोकसभा विसर्जित केली आणि लोकसभा विसर्जित झाल्यानंतर निवडणूक आयोगाने लोकसभेच्या निवडणुकांच्या संबंधात मतदार याद्या तयार करण्याचे निदेश दिले होते;

**आणि ज्याअर्थी,** या निदेशांचे पालन करण्यासाठी, लोकसभेच्या निवडणुकांकरिता १ जानेवारी १९७९ ला अनुलक्षून असणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार याद्या या, ऑक्टोबर १९७९ च्या अखेरपर्यंत तयार करण्यात येणार होत्या;

22



आणि ज्याअर्थी, यापुढे पंचायतींच्या निवडणुका उक्त विधानसभेच्या १ जानेवारी १९७७ या तारखेस अनुलक्षून तयार करण्यात आलेल्या मतदार यादीऐवजी, १ जानेवारी १९७९ या तारखेस अनुलक्षून तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार यादीच्या आधारे घेणे आणि त्यासाठी पंचायतींच्या निवडणुका लांबणीवर टाकणे इष्ट होते; सन १९५९ चा मुंबई ३.

आणि ज्याअर्थी, अशा निवडणुका घेण्यासाठी जे आवश्यक होते असे जिल्हाधिकारी आणि त्यांचा कर्मचारीवर्ग व इतर अधिकारी यांना आपले सर्व लक्ष, महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी तयार करणे व लोकसभेच्या निवडणुका घेणे या गोष्टींवर केंद्रित करणे आवश्यक असल्यामुळेही पंचायतींच्या निवडणुका लांबणीवर टाकणे आवश्यक आहे असे वाटले;

आणि ज्याअर्थी, अशा रीतीने (निवडणुका) पुढे ढकलल्यामुळे पंचायतींच्या सदस्यांचा व प्रशासकांचा पदावधी यथोचित प्रमाणात वाढविणे आवश्यक होते;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

आणि ज्याअर्थी, निवडणुका लांबणीवर टाकण्यासाठी आणि परिणामी वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे पदावधी वाढविण्यासाठी आणि उक्त गोष्टींशी संबंधित अशा इतर प्रयोजनांची तरतूद करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झाली होती; आणि म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र ग्रामपंचायती (लोकसभा निवडणुकांमुळे निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७९, दिनांक ११ सप्टेंबर १९७९ रोजी प्रख्यापित केला. सन १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.

आणि ज्याअर्थी, अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, आता भारतीय गणराज्याच्या एकतिसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, प्रारंभ व कालावधी. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ग्राम पंचायती (लोकसभा निवडणुकांमुळे निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९८० असे म्हणता येईल.

(२) तो ११ सप्टेंबर १९७९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) तो, ३१ मार्च १९८० हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत किंवा राज्य शासन, शासकीय राजपत्रातून अधिसूचित करील अशा त्या आधीच्या तारखेपर्यंत अंमलात राहील आणि त्यानंतर त्याची मुदत संपेल. हा अधिनियम समाप्त झाल्यानंतर, जणू तो महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित करण्यात आला असल्याप्रमाणे, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ लागू होईल. १९०४ चा मुंबई १.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "प्रशासक" म्हणजे, पंचायत अधिनियमाच्या कलम १६०, पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये नेमण्यात आलेला प्रशासक आणि त्यात, त्या अधिनियमाच्या कलम १४५, पोट-कलम (२), खंड (ब) किंवा कलम १५१, पोट-कलम (१), खंड (अ) अन्वये नेमण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होईल;

(ब) "पंचायतीची निवडणूक" म्हणजे, पंचायतीच्या सदस्याची निवडणूक, परंतु त्यात, सरपंचाच्या किंवा उप-सरपंचाच्या निवडणुकीचा समावेश होणार नाही;

(क) "पंचायत" म्हणजे, पंचायत अधिनियमान्वये स्थापन केलेली किंवा स्थापन करण्यात आल्याचे मानण्यात येणारी पंचायत;

(ड) "पंचायत अधिनियम" म्हणजे, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८. १९५९ चा मुंबई ३.

३. पंचायत अधिनियमामध्ये किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमांमध्ये किंवा उप-विधींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,— पंचायतींच्या विवक्षित निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे आणि पंचायतींचे सदस्य व प्रशासक यांचा पदावधी वाढवणे.

सन १९५९ चा मुंबई ३. (अ) या अधिनियमाच्या प्रारंभापासून ३१ मार्च १९८० या दिवसासह त्या तारखेपर्यंतच्या किंवा कलम १, पोट-कलम (३) अन्वये राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा अशो-दरच्या तारखेपर्यंतच्या कालावधीत (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त कालावधी" असा केला आहे) कोणत्याही पंचायतीची सार्वत्रिक निवडणूक आणि कोणत्याही पंचायतीमधील नैमित्तिक रिकामी होणारी जागा भरण्यासाठी कोणतीही पोट-निवडणूक घेण्यात येणार नाही;

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या तारखेस पदावर असणारे (मग त्यांचा पदावधी उक्त कालावधीत कोणत्याही वेळी उक्त तारखेपूर्वी किंवा उक्त तारखेस किंवा त्या तारखेनंतर संपणार असो) कोणत्याही पंचायतीचे सदस्य (मग ते निवडलेले किंवा नेमलेले असोत) किंवा कोणत्याही पंचायतीचा प्रशासक किंवा पंचायतीचे प्रशासक यांचा (कोणत्याही वाढीव पदावधीसह) पदावधी यथास्थिति, वाढवण्यात आल्याचे किंवा वाढवण्यात येणार असल्याचे मानण्यात येईल; आणि असा प्रत्येक सदस्य किंवा प्रशासक उक्त कालावधीत पद धारण करीत राहील :

परंतु, या कलमाद्वारे अशा रीतीने वाढवण्यात आलेला सदस्यांचा किंवा प्रशासकांचा पदावधी संपल्यानंतर, ते पुनर्रचित पंचायतीच्या गणपूर्ती होईल अशा पहिल्या सभेपर्यंत पदावर राहतील.

सन १९७० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७. ४. लगतपूर्ववर्ती कलमाखाली ज्यांचा पदावधी यथास्थिति, वाढवण्यात आल्याचे मानण्यात आले आहे किंवा वाढवण्यात आला आहे असे सर्व पंचायत सदस्य व सर्व पंचायत प्रशासक हे, वाढीव कालावधीत देखील (मग या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वी किंवा त्यानंतर असो) असे सदस्य किंवा यथास्थिति, प्रशासक म्हणून असलेल्या सर्व शक्तींचा वापर करण्यास आणि त्यांची सर्व कर्तव्ये व कामे पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल; आणि उक्त कालावधीत अशा कोणत्याही सदस्याने किंवा प्रशासकाने केलेले कोणतेही कृत्य हे, केवळ पदावधी वेळेवर वाढवण्यात आलेला नव्हता किंवा अन्य प्रकारे तो रीतसर वाढवण्यात आलेला नव्हता किंवा वाढीव कालावधीमध्ये पंचायत सदस्य किंवा प्रशासक हा, यथास्थिति पंचायत सदस्यांच्या किंवा प्रशासकाच्या सर्व शक्तींचा वापर करू शकत नव्हता किंवा त्याची सर्व कर्तव्ये व कामे पार पाडू शकत नव्हता, केवळ याच कारणावरून विधि अग्राह्य (बेकायदेशीर) समजण्यात येणार नाही किंवा कोणत्याही न्यायालयात त्यावर आक्षेप घेण्यात येणार नाही. ज्यांचा पदावधी वाढवलेला आहे त्या सदस्यांच्या व प्रशासकांच्या शक्ती आणि विवक्षित कृत्ये विधिग्राह्य असणे.

१९०४ चा मुंबई १. ५. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करावयाच्या तारखेनंतर (ही तारीख उक्त कालावधी संपण्यापूर्वीची तारीख असेल) जिल्हाधिकारी व इतर संबंधित अधिकारी, या अधिनियमानुसार ज्यांचा पदावधी वाढवण्यात आला आहे अशा, विद्यमान पंचायती, सदस्य व प्रशासक यांचा पदावधी संपण्यापूर्वी किंवा संपल्यानंतर शक्यतो लवकर, पंचायत अधिनियम व त्याखाली केलेले नियम व उप-विधी यांनुसार नवीन पंचायती स्थापन करण्यासाठी व्यवस्था करतील. विद्यमान पंचायती, सदस्य व प्रशासक यांचा वाढीव पदावधी संपल्यानंतर नवीन पंचायती पुन्हा स्थापन करण्यासाठी करावयाची व्यवस्था.

६. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तरतूद केलेल्या गोष्टींव्यतिरिक्त, पंचायत अधिनियमाच्या तरतुदी संबंधित पंचायतींना सर्व बाबतीत लागू होतील. सन १९५९ चा मुंबई अधिनियम ३ लागू असणे.

१९५९ चा मुंबई ३.

**अडचणी दूर करणे**

७. या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यात कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंग पडेल त्याप्रमाणे, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असल्याचे त्यास आढळून येईल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल.

**पंचायतींच्या विवक्षित निवडणुकांना अधिनियम लागू नसणे.**

८. या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, ज्यासाठी तहसीलदाराने निवडणुकीच्या किंवा पोट-निवडणुकीच्या वेगवेगळ्या टप्प्यांच्या तारखा निश्चित केलेल्या आहेत अशा कोणत्याही पंचायतीच्या कोणत्याही निवडणुकीस किंवा पोट-निवडणुकीस लागू होणार नाही, आणि अशी निवडणूक किंवा पोट-निवडणूक तहसीलदाराने ठरवलेल्या कार्यक्रमानुसार पूर्ण करण्यात येईल.

**सन १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश ७ याचे निरसन व व्यावृत्ती.**

९. (१) महाराष्ट्र ग्रामपंचायती (लोकसभा निवडणुकांमुळे निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७९ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरी उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश धरून) ही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींनुसार करण्यात आल्याचे किंवा यथास्थिति, काढण्यात आल्याचे मानण्यात येईल. १९७९ चा महा. अध्या. देश ७.

(यथार्थ अनुवाद)

**य. शं. कानिटकर,**
भाषा संचालक व पदसिद्ध उप सचिव,
सामान्य प्रशासन विभाग.